# पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम

काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दूरध्वनी क्र. – ०७२५२-२३४८२४
ई-मेल :- sp.washim@mahapolice.gov.in
वेबसाईट :- www.washimpolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

**• प्रेस नोट •** दि.२३.०४.२०२२

## परस्पर 'बंधुभाव' ठेवून आगामी सण-उत्सव साजरे करूयात. – पोलीस अधिक्षक, वाशीम.

***

आगामी मोहरम व येणारे सण - उत्सव व सद्यस्थितीमध्ये राज्यातील तापलेले धार्मिक वातावरण पाहता पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) हे समाजामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत सामाजिक एकोपा निर्माण व्हावा व सर्वांनी सर्वधर्मसमभावाने गुण्यागोविंदाने नांदावे यासाठी सतत उपक्रमशील व प्रयत्नशील आहेत. याच पार्श्वभूमीवर आज दि.२८.०७.२०२२ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम येथे जिल्हास्तरीय शांतता समिती संवाद व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर जिल्हास्तरीय शांतता समिती संवाद व आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानी पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) हे होते तर अपर पोलीस अधीक्षक श्री.गोरख भामरे (IPS) यांच्यासह जिल्हाभरातील शांतता समिती सदस्य या बैठकीस उपस्थित होते.

'आपल्या भारत देशामध्ये सर्व धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदतात. आपली संस्कृती जपत आपले सण/उत्सव उत्साहात साजरे करतात. परंतु काही समाजकंटक लोक त्यांच्या वैयक्तिक फायद्याकरिता सहेतुकपणे जाती-धर्मामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. परंतु अशा लोकांच्या आहारी न जाता आपण आपल्या व इतर धर्मियांच्या भावनांचा आदर करत आपले सण/उत्सव साजरे केले पाहिजे. तसेच एकमेकांना समजून घेऊन गुण्यागोविंदाने खेळीमेळीच्या वातावरणात राहिले पाहिजे. परस्पर प्रेम व बंधुभाव जोपासला पाहिजे.' असे प्रतिपादन मा.पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांनी शांतता समिती संवाद व आढावा बैठकीत मार्गदर्शन करतांना केले. यावेळी अपर पोलीस अधीक्षक श्री.गोरख भामरे (IPS) यांनीसुद्धा आगामी काळातील सण/उत्सवांच्या निमित्ताने शांतता व सलोखा कायम राहील व परस्पर स्नेह अधिक वृद्धिंगत होईल यासंदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्हास्तरीय शांतता समिती सदस्य श्री.अन्सार मौलाना, श्री.राजू कीडसे पाटील, श्री.माधवराव अंभोरे, श्री.सुनील मालपाणी, श्री.सुशील भिमजियानी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

आगामी मोहरमसह येणारे सण, उत्सव शांततेत पार पाडण्याकरिता वाशिम जिल्हा पोलीस दल सुसज्ज असून सर्वांनी शांतता राखत सण, उत्सव साजरे करावे व कायद्याचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.

**(जनसंपर्क अधिकारी)**
पोलीस अधिक्षक कार्यालय,
वाशिम यांचेकरिता